देखभाल

# गव्हावरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन




**वैभव गिरी**
सहायक प्राध्यापक
(मो.नं.९१४६४१२२१०)
कृषी कीटकशास्त्र विभाग,
रामकृष्ण बजाज
कृषी महाविद्यालय, पिपरी,
जि. वर्धा








> महाराष्ट्रात गहू या पिकावर प्रामुख्याने मावा, खोडकिडी, तुडतुडे, वाळवी इत्यादींचा प्रादुर्भाव होतो. तसेच प्राण्यांमध्ये उंदरांचा प्रादुर्भाव होतो. त्याचबरोबर नारंगी तांबेरा, पिवळा तांबेरा, खोडावरील काळा तांबेरा, काणी हे रोग पडतात. याकरिता शेतकरी बांधवांनी फक्त कीटकनाशकांवर अवलबून न राहता एकात्मिक व्यवस्थापन केले पाहिजे.

रब्बी हंगामातील गहू हे एक महत्त्वाचे धान्यपीक आहे. महाराष्ट्रातील गव्हाची प्रतिहेक्टरी उत्पादकता एकूण भारतातील गहू उत्पादकतेपेक्षा फारच कमी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे उष्ण हवामान, दुसरे म्हणजे कीड व रोगांची अपुरी माहिती तसेच एकात्मिक व्यवस्थापनाचा अभाव. या पिकावर अनेक किडी येतात. परंतु महाराष्ट्रात गहू या पिकावर प्रामुख्याने मावा, खोडकिडी, तुडतुडे, वाळवी इत्यादींचा प्रादुर्भाव होतो. तसेच प्राण्यांमध्ये उंदरांचा प्रादुर्भाव होतो. त्याचबरोबर नारंगी तांबेरा, पिवळा तांबेरा, खोडावरील काळा तांबेरा, काणी हे रोग पडतात. शेतकरी बांधवांनी फक्त कीटकनाशकांवर अवलबून न राहता एकात्मिक व्यवस्थापन केले पाहिजे. याकरिता हा लेख नक्कीच उपयोगी पडेल.

**याप्रमाणे करा उपाय**

१) जमिनीची खोल नांगरट करून दोन ते तीन कुळवण्या करुन काडी-कचरा, धसकटे वेचून शेत साफ ठेवावे.

२) जमिनीच्या उताराला आडव्या सरी/ सारे पाडून पेरणीसाठी तयारी करावी.

३) पिकाची फेरपालट करावी.

४) तांबेरा रोगास बळी न पडणाऱ्या किंवा तांबेरा प्रतिकारक्षम जातींची शिफारशीनुसार निवड करावी.

५) शेतात पक्षी थांबे २५ / हे. लावावे.

६) रासायनिक खतांची संतुलित मात्रा घ्यावी. नत्राचा शिफारशीपेक्षा अधिक वापर केल्यास गव्हाचे पीक तांबेरा रोगास जास्त प्रमाणात बळी पडते.

७) भारी जमिनीत पिकास पाणी जरुरीपुरते व बेताचे द्यावे.

८) साधारणपणे मध्यम ते भारी जमिनीत १८ ते २१ दिवसांच्या अंतराने व हलक्या जमिनीत १० ते १५ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या एकूण तीन ते चार पाळ्या द्याव्यात. अति पाणी दिल्याने त्या शेतातील हवामान जास्त दमट होऊन तांबेरा रोगाच्या फैलावास मदत होते.

९) एक वेळा तांबेरा प्रतिबंधक जातीची लागवड केल्यानंतर त्यापासून मिळणाऱ्या गव्हाचा वापर शेतकरी पुढील वर्षी बियाणे म्हणून करू शकतात. कारण गव्हामध्ये परस्पर संकर नसतो. कारण हे पीक स्वपरागीकरण करणारे (सेल्फ पॉलिनेटेड) आहे.

१०) वाळवीचा बंदोबस्त करण्यासाठी बांधावर असलेली वारुळे खणून काढावीत व त्यातील राणीचा नाश करावा.

११) खोडकिड्यामुळे प्रादुर्भावित झालेली झाडे नष्ट करावीत.

१२) खोडकिडीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस या मित्रकीटकांची अंडी उगवणीनंतर दीड लाख प्रतिहेक्टर या प्रमाणात दोन आठवड्यांनी सोडण्यास सुरूवात करून, दर दहा दिवसांच्या अंतराने तीन ते चार वेळा सोडावीत.

१३) निंबोळी अर्काची ५ % किंवा निम तेलाची २ % फवारणी करावी.

१४) शेतामध्ये पिवळे चिकट सापळे (स्टिकी ट्रॅप) वापर एकरी ४ सर्वेक्षण व एकरी १० नियंत्रणासाठी या प्रमाणात करावा. शेतात पंख असलेली मावा कीड उडताना या कार्डला चिकटते. त्यांच्या प्रमाणावरून कीड नियंत्रणासाठी उपाययोजना आखता येतात. या सापळ्यावर असंख्य तुडतुडे सुद्धा चिकटल्याचे निदर्शनास येते. तसेच पांढऱ्या माश्या व फुलकिड्यांचे पण नियंत्रण होते.

१५) व्हर्टिसिलियम लेकॅनी किंवा मेटारायझिम नासोप्ली ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे १० ते १५ दिवसांचे अंतराने दोन वेळा फवारणी करावी. या उपयुक्त जैविक घटकयुक्त कीटकनाशकामुळे मावा किडीचे नियंत्रण प्रभावीपणे होते. या बुरशीचे बिजाणू मावा किडीच्या शरीराशी संपर्कात येऊन किडीला रोगग्रस्त करून नियंत्रित करतात. हवेत, जमिनीत व पिकावर हे बुरशीचे बिजाणू त्या ठिकाणी त्या हंगामात राहत असल्याने पुढील काळात किडींवर नियंत्रण राहण्यास मदत होते.

१६) जैविक उपाययोजना करूनही कीड नियंत्रित होत नसल्यास मावा, तुडतुडे किडींच्या नियंत्रणासाठी ॲसिटामिप्रिड २०% एस.पी. ५ ग्रॅम किंवा एमिडाक्लोप्रिड १७.८% एस.एल.५ मि.लि. किंवा थायमिथोक्झॅम २५% डब्ल्यू.पी. ३ ग्रॅम किंवा डायमिथोएट ३०% ई.सी.१० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

१७) तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव होताच १० मि.लि. प्रोपिकोनॅझोल प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळा फवारणी करावी किंवा २० ग्रॅम मॅन्कोझेब किंवा २० ग्रॅम कॉपर ऑक्झिक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

१८) वाळवीचा बंदोबस्त करण्यासाठी बांधावर असलेली वारूळे खणून काढावीत व त्यातील राणीचा नाश करावा. वारुळ नष्ट केल्यानंतर जमीन सपाट करावी व मध्यभागी सुमारे ३० सें.मी. खोलवर एक छिद्र करावे आणि त्यात क्लोरोपायरिफॉस २० टक्के प्रवाही हे कीटकनाशक १५ मि.लि. १० लिटर पाण्यात मिसळून या औषधाचे मिश्रण ५० लिटर एका वारुळासाठी या प्रमाणात वारुळात टाकावे. तसेच फोरेट १० टक्के दाणेदार किंवा कार्बोफ्युरॉन ३% दाणेदार हेक्टरी २५ किलो जमिनीत टाकावे आणि जमिनीमध्ये निंबोळी पेंड २०० किलो प्रतिहेक्टरी टाकावी.

१९) खोडकिडीच्या नियंत्रणासाठी क्लोरॲट्रानिलिप्रोल १८.५% एस.सी.३ मि.लि. किंवा इमामेक्टिन बेन्झोएट ५% एस.सी.३ ग्रॅम किंवा क्लोरोपायरिफोस २०% ई.सी. २० मि.लि. किंवा लॅम्डासायहॅलोथ्रिन ५% एस.सी. १० ग्रॅम किंवा इंडोझिकार्ब १५.८ % ई.सी. १० मि.लि. किंवा प्रोफेनोफोस ५०% ई.सी. २० मि.लि. किवा क्विनॉलफॉस २०% ई.सी. २० मि.लि. किंवा स्पिनोसाड ४५% एस.सी. ३ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. ■